भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता (Bharat Innovation, Research, Start-up for Aatmnirbharta: BIRSA)योजना राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्र. मनासो-२०२६/प्र.क्र. १८/ कौशल्य-२**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक: ०२ मार्च, २०२६**

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्यातील समृद्ध पारंपरिक ज्ञानप्रणाली, वनाधारित उपजीविका, स्थानिक तंत्रज्ञान तसेच सांस्कृतिक उद्योगांची परंपरा असणाऱ्या अनुसूचित जमातीकडे कल्याणाधिष्ठित दृष्टिकोनासह नाविन्य, कौशल्य व उद्योजकता आधारित आर्थिक सक्षमीकरणाकडे संक्रमण करणे आवश्यक आहे. याकरिता आदिवासी बहूल क्षेत्रातील स्टार्टअप परिसंस्था अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS) ही संस्था "महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५" अंतर्गत राज्यात सर्वसमावेशक स्टार्टअप परिसंस्था विकसित करण्यासाठी कार्यरत आहे. त्यानुसार अनुसूचित जमातीतील युवानां नाविन्यपूर्ण परिसंस्थेच्या प्रवाहात आणण्यासाठी "बिरसा : भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता (Bharat Innovation, Research, Start-up for Aatmnirbharta: BIRSA)" ही योजना राबविण्याचा बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

अनुसूचित जमातीतील युवांना नाविन्यपूर्ण परिसंस्थेच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्यात "भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता (Bharat Innovation, Research, Start-up for Aatmnirbharta: BIRSA)" ही योजना राबविण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. **योजनेचे उद्दिष्ट :**

१. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे अनुसूचित जमातीतील युवक, समुदाय संस्था आणि पारंपरिक ज्ञानधारक यांना नाविन्यतेवर -आधारित उद्योजक आणि उद्योगनिर्माते बनण्यासाठी सक्षम करून महाराष्ट्रात संरचित आदिवासी स्टार्टअप परिसंस्था प्रोत्साहित करणे होय.
२. आदिवासी जिल्ह्यांना स्थानिकीकृत नावीन्यपूर्ण क्लस्टर्समध्ये रूपांतरित करणे जिथे पारंपरिक ज्ञानप्रणाली, वन अर्थव्यवस्था, कृषी, हस्तकला, हवामान लवचिकता,उद्योन्मुख तंत्रज्ञान आणि डिजिटल सेवांमधून उद्भवणाऱ्या संकल्पनांचे स्टार्टअप्समध्ये रूपांतर केले जाईल.
३. ही योजना कल्पना शोध, इन्क्युबेशन, मार्गदर्शन, बीज भांडवल उपलब्धता, बाजारपेठ साहाय्य व विविध डिजिटल प्लॅटफॉर्मशी जोडणी तसेच जिल्हास्तरीय संस्थात्मक क्षमता निर्माण अशा संपूर्ण उद्योजकता साखळीची उभारणी करेल.
४. अनुसूचित जमातीतील युवक, समुदाय संस्था व पारंपरिक ज्ञानधारकांना नाविन्यतेवर आधारित उद्योजक व उद्योगनिर्माते बनवून रोजगार-शोधक मार्गांवरून रोजगार-निर्माता करून महाराष्ट्रात संरचित आदिवासी स्टार्टअप परिसंस्था विकसित करण्यात येईल.
५. सदर योजने अंतर्गत सुमारे ५०० नवउद्योजक, २०० स्टार्टअप्स व १०,००० अनुसूचित जमातीतील युवानां इन्क्युबेशन सहाय्य, आर्थिक मदत, बाजारपेठ जोडणी आणि डिजिटल सक्षमिकरण तसेच नाविन्यपूर्ण व्यवसाय मार्गदर्शन पुरवण्यात येईल.

**३. योजनेचा कालावधी:**

सदर योजना सन २०२६-२७ ते सन २०२९-३० (४ वर्ष) या कालावधीमध्ये प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येईल.

**४. भौगोलिक व्याप्ती:**

प्रायोगिक तत्वावर नंदुरबार, गडचिरोली, पालघर, नाशिक व चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश असेल. तसेच कार्यक्षमता व परिणाम मूल्यांकनानंतर सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यात येईल.

**५. योजना आराखडा:**

सदर योजना प्रामुख्याने खालील एकात्मिक स्तंभांद्वारे कार्यान्वित होईल.

१. **जिल्हा आदिवासी नाविन्यता व इन्क्युबेशन केंद्र** : सदर केंद्रे "महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नाविन्यता धोरण २०२५" अन्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे स्थापन करण्यात येतील. इन्क्युबेशनची मेंटरींग व स्थापना स्थानिक तज्ञ व महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत शासन पुरस्कृत इन्क्युबेटर च्या सहाय्याने केली जाईल. कल्पनांचा शोध, इन्क्युबेशन सहाय्य, आणि स्थानिक नाविन्यपूर्ण उद्योजक परिसंस्था विकसित करण्यासाठी ही केंद्रे जबाबदार असतील. शासनाच्या इतर आदिवासी योजनांशी अभिसरण करून युवांना या केंद्रांमार्फत मार्गदर्शन पुरविले जाईल.

२. **अर्थसहाय्य उपक्रम :** या योजने अंतर्गत आदिवासी नवउद्योजक व स्टार्टअप्स यांना विविध उपक्रमांद्वारे अर्थ सहाय्य पुरविण्यात येतील. या अंतर्गत टप्पानिहाय बीज भांडवल व प्रोटोटाइप अनुदान इ. प्रदान करण्यात येईल. आश्वासक, नाविन्यपूर्ण व प्रभावी नवउद्योगांना प्राधान्य देईल. योजनेच्या लाभार्थ्यांना जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)याअंतर्गत नावीन्यपूर्ण योजनासाठी राखीव निधी तसेच इतर बँकिंग संस्था, CSR घटक, खाजगी गुंतवणूकदार यांच्याशी जोडून गुंतवणूकीच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यात येतील.

३. **बाजारपेठ जोडणी आणि डिजिटल सक्षमीकरण:** आदिवासी नवउद्योजक व स्टार्टअप्स यांना त्यांचे नाविन्यपूर्ण उत्पादने व सुविधा स्थानिक बाजारपेठेपर्यन्त मर्यादित न राहता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नेण्यासाठी आवश्यक ते सहाय्य पुरविले जाईल. या अंतर्गत डिजिटल सक्षमिकरण, मार्केटिंग सहाय्य तसेच योग्य भागीदारांशी जसे की ONDC, GeM, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म इ यांच्याशी जोडण्यात येईल.

४. **नाविन्यपूर्ण व्यवसाय मार्गदर्शन व क्षमता बांधणी:** आदिवासी विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण व्यवसाय मार्गदर्शन करण्यासाठी तसेच उद्योजकीय क्षमता प्रणाली विकसित करण्यासाठी विशेष सत्रे, कार्यशाळा इ आयोजित करण्यात येतील

**६. अंमलबजावणी यंत्रणा**

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS), मुंबई नोडल एजन्सी म्हणून राहील. तथापि सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हास्तरीय यंत्रणेमार्फत करण्यात येईल.

या योजनेची कार्यपद्धती व मार्गदर्शक तत्त्वे प्रसिध्द करणे, डिजीटल प्लॅटफॉर्म माध्यमातून अंमलबजावणी प्रक्रीया, इन्क्युबेशन सहाय्य इ. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीद्वारे करण्यात येईल.

तसेच योजनेच्या आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता समितीमार्फत देण्यात येतील.

७. या योजनेसाठी दक्ष प्रकल्पाची प्रकल्प समन्वय समिती (Project Coordination Committee-PCC) या योजनेसाठी राज्यस्तरीय समन्वय समिती म्हणून काम पाहिल. तसेच सदर समितीच्या बैठकीसाठी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून सचिव, आदिवासी विकास विभाग/आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय व दोन तज्ञ सदस्य यांना निमंत्रित करता येईल.

## ८. योजनेसाठी आर्थिक तरतूद

सदर योजना चार वर्षाच्या कालावधीसाठी प्रयोगिक तत्वावर राबविण्यात येईल. याकरिता ₹२५ कोटी (रुपये पंचवीस कोटी फक्त) निधी उपलब्ध करण्यात येईल.

९. या योजनेचा खर्च लेखाशिर्ष मागणी क्रमांक झेडए-२, मुख्य लेखाशिर्ष २२३० कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास, ००१, संचालन व प्रशासन, (०१) सेवायोजन संचालक, (०१) (१७) मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (दक्ष प्रकल्प) (राज्य हिस्सा ३०%) (कार्यक्रम), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२३० A८४४) व मागणी क्रमांक झेडए-२, मुख्य लेखाशिर्ष २२३० कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास, ००१, संचालन व प्रशासन, (०१) सेवायोजन संचालक, (०१) (१८) मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (दक्ष प्रकल्प) (जागतिक बँक हिस्सा ३०%) (कार्यक्रम), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२३० A८५३) या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (दक्ष) प्रकल्पाच्या लेखाशिर्षातून खर्च करण्यासाठी घोषित नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी या योजनेसाठी कायम राहतील.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३०२२००८३१५३०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA VERMA

Digitally signed by MANISHA VERMA
DN: c=IN, o=Personal, title=2202,
2.5.4.20=c2db39887c1911b725a77fd36389bdd5b364615fed
b75d9c0838ff98c4d7faed, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=ad13940cd46b998d221871156f32c2ee899ee8
fe4333bf32214366a4af3741da, cn=MANISHA VERMA
Date: 2026.03.02 20:09:57 +05'30'

**( मनिषा वर्मा )**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विधापरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता)/( लेखा परिक्षा), मुंबई

१०. महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता)/( लेखा परिक्षा), नागपूर
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कोकण भवन, नवी मुंबई.
९. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. अधिदान व लेखाअधिकारी, मुबई.
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५. सह सचिव/उप सचिव/ विशेष कार्य अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती (कौशल्य-२)